**पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**दिनांक 12/11/2019 (मंगळवार)**
**(सायंकाळ)**

---

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. कुही :- अंतर्गत 02 कि.मी. अंतरावरील मौजा कुही ते मांढळ रोडवर महाकाली देशीभट्टी जवळ येथे दिनांक 11/11/2019 चे 13:00 वा. ते 13:30 वा. दरम्यान भोजराज आनंद मानवटकर, वय 55 वर्ष, रा. चिपडी हे त्यांच्या सायकलने कुही ते चिपडी येथे जात होते. दरम्यान मागुन येणाऱ्या एमएच- 40/बीई-4613 क्रमांकाचा क्रेनचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोर जाणाऱ्या सायकला धडक दिली. या अपघातात सायकल स्वार भोजराज मानवटकर यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- पदमाकर श्यामरावजी नानवटकर, वय 37 वर्ष, रा. चिपडी, ता. कुही यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. पंजागराव परघने हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर